महाराष्ट्र शासन

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,

बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि.५/महिला धोरण/२०२५/ 1757

दिनांक : 5 MAR 2025

**परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील

सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रमांच्या संस्था ,

**विषय :** सर्व शिक्षण संस्थांनी विद्यार्थीनिंसाठी तीन महिन्याच्य कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणेबाबत..

**संदर्भ :** १.शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५/आस्था-२,दि.११/१/२०२१

२.संचालनालयाचे परिपत्रक पत्र क्र.२/तंशिसं/एनजीसी/महिला धोरण/२०२४/१३७,दि.१३/०३/२०२४

३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र तंशिविकापु/शै.वि.४/महिला धोरण/२०२४/१२९३,दि.२०/३/२०२४

४. संचालनालयाचे परिपत्रक पत्र क्र.२/तंशिसं/एनजीसी/महिला धोरण/२०२४/६९४,दि.०३/०९/२०२४

५.या कार्यालयाचे परिपत्रक क्र तंशिविकापु/शै.वि.५/महिला धोरण/२०२४/३९८७,दि.०३/१०/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, महाराष्ट्र शासनाने सन २०१४ मध्ये ३ रे महिला धोरण जाहिर केले आहे. या धोरणातील मुद्दा क्र. ६.१३ अन्वये " सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे" बाबत संदर्भ क्र. ३ व ५ मधील परिपत्रकान्वये आपणांस सूचित करण्यांत आले होते. तथापि, प्रस्तुत प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनांस आले आहे.

याबाबत आपणांस पुनश्च कळविण्यांत येते की महिला धोरण २०१४, मुद्दा क्र. ६.१३ नुसार कार्यवाही करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या खाली जोडलेल्या Google Form मध्ये भरून संस्थाप्रमुखांच्या स्वाक्षरीसह अहवालाची पीडीएफ फाईल अपलोड करावी.

सदर माहिती तात्काळ या कार्यालयांस सादर करावी.

(मा.रा.जाधव)

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

सोबत :१. Google Form link

२. संदर्भिय पत्र व परिपत्रके

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in


**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/शै.वि.५/महिला धोरण/२०२४-२५/ 3987
दिनांक : - 3 OCT 2024

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील
सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमांच्या संस्था ,

**विषय :** सर्व शिक्षण संस्थांनी विद्यार्थीनिंसाठी तीन महिन्याच्य कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणेबाबत..

**संदर्भ :** १.शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५/आस्था-२,दि.११/१/२०२१
२.संचालनालयाचे परिपत्रक पत्र क्र.२/तंशिसं/एनजीसी/महिला धोरण/२०२४/१३७,दि.१३/०३/२०२४
३. या कार्यालयाचे परिपत्रक क्र तंशिविकापु/शै.वि.४/महिला धोरण/२०२४/१२९३,दि.२०/३/२०२४
४. संचालनालयाचे परिपत्रक पत्र क्र.२/तंशिसं/एनजीसी/महिला धोरण/२०२४/६९४,दि.०३/०९/२०२४

उपरोक्त विषयास अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, महाराष्ट्र शासनाने सन २०१४ मध्ये ३ रे महिला धोरण जाहिर केले आहे. या धोरणातील मुद्दा क्र. ६.१३ अन्वये सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्याच्य कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे बाबत संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये आपणांस सुचित करण्यांत आले होते. तथापि, प्रस्तुत प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनांस आले आहे.

याबाबत आपणांस पुनश्च कळविण्यांत येते की महिला धोरण २०१४, मुद्दा क्र. ६.१३ नुसार कार्यवाही करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या खाली जोडलेल्या Google Form मध्ये भरून संस्थाप्रमुखांच्या स्वाक्षरीसह पीडीएफ फाईल अपलोड करावी.

सदर माहिती त्वरीत या कार्यालयांस सादर करावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

सोबत :१. Google Form link
२. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णय

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६५, ४९२, ४४२, ४४३, ४४७
ई-मेल - desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : http://dte.maharashtra.gov.in

क्र. २/तंशिसं/एनजीसी/महिला धोरण/२०२४/६०४ दिनांक : - 3 SEP 2024

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 25 SEP 2024 आवक क्र. 7855

विषय : महिला धोरण २०१४ मुद्दा क्र.६.१३ ची अंमलबजावणी करणेबाबत..

संदर्भ : १. संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/तंशिसं/एनजीसी/महिला धोरण/२०२४/१३७, दि.१३.०३.२०२४
२. श्री.अमर अनिता जालिंदर एकाड, संस्थापक, दीपू फाऊंडेशन, पुणे यांचा दि.०३.०९.२०२४ रोजीचा ई-मेल

महाराष्ट्र शासनाने सन २०१४ मध्ये ३ रे महिला धोरण जाहिर केले आहे. या धोरणातील मुद्दा क्र.६.१३ अन्वये "सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे." बाबत संदर्भ क्र.१ च्या परिपत्रान्वये आपणांस सूचित करण्यात आले होते. तथापि, प्रस्तुत प्रकरणी अद्याप कार्यवाही झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

याबाबत आपणांस पुनश्च कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थाकडून महिला धोरण २०१४, मुद्दा क्र.६.१३ नूसार कार्यवाही करणेबाबत, आपल्या स्तरावरून सर्व संस्थांना विनाविलंब सूचित करण्यात यावे.

( डॉ.सुनिल भामरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीकरीता सादर
१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२
२) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठ/ अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहायित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
३) मा.संस्थापक, दीपू फाऊंडेशन, पुणे यांना ई-मेलव्दारे (deepufoundation१९८४@gmail.com)

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,

मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/ 1293 दिनांक : 20 MAR 2024

**परिपत्रक-**

**प्रति,**

प्राचार्य

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त

सर्व संस्था, पुणे विभाग, पुणे

**विषय : सर्व शिक्षण संस्थांनी विद्यार्थीनीसाठी तीन महिन्याच्या कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणेबाबत..**

संदर्भ : १. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल यांचे पत्र क्र.विससं/उशि/कोविप/मशि/२०२४३८२ दि.१४.०२.२०२४

२. शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०५/आस्था-२, दि.११.०२.२०२१

उपरोक्त विषयांस अनुसरून या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने २०१४ मध्ये ३ रे महिला धोरण जाहिर केले आहे. महिला धारेण २०१४ मधील मुद्दा क्र.६.१३ नुसार सर्व शिक्षण संस्थांनी विद्यार्थीनीसाठी तीन महिन्याचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविण्याबाबत सूचित केलेले आहे.

तरी सर्व संस्थांनी/महाविद्यालयांनी महिला धारेण २०१४ मधील मुद्दा क्र.६.१३ नूसार विद्यार्थीनीसाठी तीन महिन्याचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविण्यात यावा.

सोबत- संदर्भिय पत्रे.

(डॉ. द. व्यं. जाधव)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.

# महाराष्ट्र शासन

do.asthahie-mh@gov.in
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र:संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०५/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२

दिनांक: ११.०१.२०२१

प्रति,

संचालक (उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण/कला/ग्रंथालय)
पुणे/मुंबई.

विषय : महिला धोरण-२०१४ मध्ये आपल्या विभागाशी निगडीत असलेल्य बाबींविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत...

उपरोक्त विषयाचे महिला व बाल विकास आयुक्तालय, दिनांक ३१.१२.२०२० चे पत्र कृपया पहावे. (सोबत जोडले आहे)

२. सदर पत्रातील सूचनांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती त्वरित उपलब्ध करुन द्यावी.

(अमोल उगलमुगले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Scanned with OKEN Scanner

जा.क्र. मबाविआ/मवि/महिला धोरण/२०२०-२१/
महिला व बाल विकास आयुक्तालय,
२८, राणीचा बाग, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दुरध्वनी क्र.०२०/२६३३००५२, ५७
दिनांक ०१/१२/२०२०

मा. अपर मुख्य सचिव,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.प्रधान सचिव,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
अल्पसंख्यांक विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.प्रधान सचिव,
कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.सचिव,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई

मा.सचिव,
परिवहन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.सचिव,
माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
वित्त व नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,
मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,
मुंबई

मा. प्रधान सचिव,
सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. सचिव,
सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.सचिव,
वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. अपर मुख्य सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,
मुंबई

मा.प्रधान सचिव,
पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.प्रधान सचिव,
गृह निर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
पशुसंवर्धन, दुग्धविकास व
मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई

मा. प्रधान सचिव,
आदिवासी विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.सचिव,
उच्च तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,
मुंबई

मा.सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य
विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.सचिव,
क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई

विषय:- महिला धोरण-२०१४ मध्ये आपल्या विभागाशी निगडीत असलेल्या बाबींविषयी केलेल्या कार्यवाहीबाबत ..

महोदय/ महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने २०१४ मध्ये ३ रे महिला धोरण जाहीर केले आहे. त्यामधील तरतूदींचा आढावा घेणे, त्यात काळानूरूप बदल करणे व महिला धोरण अधिक लोकाभिमुख करण्याच्या अनुषंगाने सदर धोरणांच्या उदिष्टांच्या पुर्ततेबाबतचा अहवाल विधीमंडळातील महिला व बाल हक्क समिती ०१.

यांचेकडे सादर करावयाचा आहे. महिला धोरणात नमूद केलेल्या आपल्या विभागाशी संबंधित मुद्यांच्या अनुषंगाने विभागाने त्यांच्या सुसंगत योजनेच्या अंतर्गत केलेल्या कार्यवाहीची माहिती या सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये भरून देण्यात यावी. त्यामध्ये लक्षपुर्ती साठी करण्यात आलेली योजना, योजनेचे लक्ष /उदीष्टे, सन २०२०-२१ मध्ये ठेवण्यात आलेले लक्ष/उदिष्टे

Scanned with OKEN Scanner

व झालेली पुर्तता तसेच सन २०२१-२२ या वर्षामध्ये प्रस्तावित केलेले लक्ष याबाबतची माहिती रकाना परिशिष्टातील क्र. ४ : ११ मध्ये नमूद करून देण्यात यावी. उदाहरणासाठी महिला व बाल विकास विभागाचा नमूना सोबत देण्यात आलेला आहे.

तरी आपल्या विभागाने महिला धोरण २०१४ च्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती त्वरीत महिला व बाल विकास आयुक्तालयास देण्यात यावी, हि विनंती. तसेच सदर कार्यासाठी शासन स्तरावर उप सचिव दर्जाचे अधिकारी नोडल अधिकारी घोषित करुन त्यांचे नांव, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल या विभागाच्या ई-मेल commissionerwcdpune@gmail.com व dcmahilavikas@gmail.com वर देण्यात यावी.

सोबत:- आपले विभागाशी संबंधित बाबींचे परिशिष्ट,
उदाहरण परिशिष्ट व महिला धोरण मुळ पुस्तिका

आपला विश्वासू

31.12.20

(डॉ. हृषिकेश यशोद)
भा.प्र.से.
आयुक्त
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत:

१. मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तसेच संबंधित विभागाच्या सचिवांना आपल्याकडून निर्देशित करण्याकरिता सादर.
२. खाजगी सचिव, मा.मंत्री, महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन, मुंबई
३. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन, मुंबई

Scanned with OKEN Scanner

(उदाहरण परिशिष्ट)

# महिला धोरण- २०१४

## महिला धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी धोरणातील क्रियाशील मुद्दे

विभागाचे नाव : महिला व बाल विकास विभाग

| अ.क्र | धोरणातील मुददा क्रमांक | तपशिल | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष्य/ उदिष्ट | वर्ष- २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२२ प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष्य | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष्य | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | १५.१.१ | स्त्रीयांचा कामात सहभाग वाढविण्यासाठी नोकरदार महिलांसाठी प्रत्येकी महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी २०० प्रवेश क्षमतेचे किमान १ व मुंबई उपनगरात किमान २ वसतीगृहे उपलब्ध करुन देण्यात येतील. | नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृहे (WWH) | नोकरी करणाऱ्या महिलांना वाजवी दराने निवासी व्यवस्था उपलब्ध करणे. | - | ६+२=८ | ३८ | - | | - | सहा विभाग व मुंबई उपनगर मध्ये एकुण ३८ नोकरी करणाऱ्या महिलांचे वसतिगृह स्थापित आहेत. त्यांची क्षमता ७४५ इतकी आहे. लक्ष्य साध्य झालेले आहे. |



Scanned with OKEN Scanner

महिला धोरण- २०१४ (परिशिष्ट)

महिला धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी धोरणातील क्रियाशील मुद्दे

विभागाचे नाव : उच्च व तंत्रशिक्षण विभाग

| अ. क्र. | धोरणातील मुद्दा क्रमांक | तपशिल | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्टे | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | ३ | महिलांसाठी सनद :- शासनाचे जे विभाग महिलांसाठी योजना राबवितात, त्या योजनांची माहिती कार्यालयाच्या आवारात सनद म्हणून प्रसिध्द करण्याबाबत सूचना दिल्या जातील. प्रत्येक विभागाने अशी सनद दरवर्षी तयार करुन त्यात गरजेनुसार आवश्यक ते बदल करुन ही सनद ३१ मे पर्यंत महिला व बाल विकास विभागाकडे सादर करणे बंधनकारक राहील. महिला व बाल विकास विभाग सर्व विभागांकडून प्राप्त झालेली माहिती १५ ऑगस्ट रोजी पुस्तिकारुपाने प्रकाशित करेल. सदर पुस्तिका शासनाच्या संकेत स्थळावरही उपलब्ध करुन देण्यात येईल.<br><br>शासनाच्या प्रत्येक कार्यालयाच्या आवारात सनद प्रदर्शित करतांना त्या विभागाच्या योजनांमध्ये महिलांसाठी किती जागा आहेत. सदर महिलांच्या जागांमध्ये जातीनिहाय समांतर आरक्षणानुसार किती जागा आहेत. यांचे विवरण असणे आवश्यक आहे. तसेच अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी जागा आरक्षित असाव्यात. प्रत्येक विभाग त्यांच्या अखत्यारितील महिलांसाठीच्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करील व वेळोवेळी नियमितपणे त्याचा आढावा घेऊन पाठपुरावा करेल. तसेच त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात भरीव तरतूद करेल आणि अशा सर्व योजनांची कार्यनिष्पत्ती तपासण्यासाठी त्याचे मुल्यमापन करणे त्या विभागावर बंधनकारक राहील. त्यासाठी अंदाजपत्रकात भरीव तरतूद करणे व मुल्यमापन करणे बंधनकारक राहील. | | | | | | | | | |
| २ | ४.१.२ | प्रत्येक विभागाने अंदाजपत्रक तयार करताना त्यांच्या विविध योजनांमध्ये केलेल्या आर्थिक तरतुदींचे मुल्यमापनक व त्यांची अपेक्षित फलनिष्पती विश्लेषणात्मक अहवाल विधीमंडळातील महिला व बाल हक्क समितीपुढे दरवर्षी सादर केला जाईल या समितीकडून तपासून तो विधानमंडळापुढे सादर केला जाईल. ही प्रक्रिया जिल्हानियोजन व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ही राबविण्यात येईल व त्याची अंमलबजावणी संबंधित प्रशासकीय विभाग करतील. | | | | | | | | | |
| ३ | ४.१.३ | प्रशासकीय विभागाकडून सदर प्रयोजनार्थ उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या निधीचा विनियोग हा महिलाकेंद्री प्रत्यक्ष कामासाठीच वापरण्यात येईल याची खबरदारी प्रत्येक विभागाचा प्रमुख स्वत: घेईल व तो यासंदर्भात शासन व विधीमंडळास उत्तरदायी असेल. | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | धोरणातील मुद्दा क्रमांक | तपशिल | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्ट्ये | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ४ | ४.१.४ | प्रत्येक विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ महिला व मुलींमला मिळावा याकरीता सुस्पष्ट नियम व मार्गदर्शक तत्वे तयार केली जातील. | | | | | | | | | |
| ५ | ४.२१ | महिलांचे शिक्षण | | | | | | | | | |
| ६ | ५.५.१ | महिलांचे हक्क, महिला धोरण व महिलांविषयक कायदे प्रत्येक महिलेपर्यंत पोहोचविणे- सदर प्रयोजनार्थ माहिती व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महिलांशी संबंधित कायदे, धोरण, योजना, त्यांचे अधिकार कळण्यासाठी व तातडीच्या प्रसंगी संपर्क साधने शक्य होण्यासाठी जबाबदार अधिकारी, कार्यालय, स्वयंसेवी संस्थांचे पत्ते व दुरध्वनी क्रमांकाची सविस्तर माहिती सर्व शासकीय विभाग व कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ७ | ५.५.२ | सदरची माहिती शाळा, महाविद्यालय, सरकारी व खाजगी कार्यालये, सार्वजनिक संस्था, कारखाने, व्यावसायिक आस्थापना यांनी त्यांच्याशी संबंधित मुली / महिला यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित आस्थापनांना सूचना दिल्या जातील. | | | | | | | | | |
| ८ | ६.१ | शिक्षण व संशोधन - महिलांना शैक्षणिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या संधींची माहिती स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत शाळा महाविद्यालयात पोहोचविण्यात येईल. | | | | | | | | | |
| ९ | ६.२ | नोकरी व रोजगाराच्या निमित्त क्षेत्रातील संधी व त्याच्या निवडीविषयक समुपदेशनाची सुविधा उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. | | | | | | | | | |
| १० | ६.३ | शासकीय व अशासकीय स्वयंसेवी संस्थाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या व अभ्यासवृत्ती (fellowship) विषयाची माहिती शिक्षण संस्थामध्ये प्रदर्शित करण्याच्या सुचना शैक्षणिक संस्थाच्या व्यवस्थापनास करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ११ | ६.५ | उच्च शैक्षणिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण देणाऱ्या संस्थांत उपलब्ध राखीव जागा व भरलेल्या जागा यांची अकडेवारी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर दरवर्षी संस्थेच्या आवारातच ठळकपणे प्रदर्शित करणे बंधनकारक असेल. | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

| क्र. | मुद्दा क्रमांक | उपाय | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्टे | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १२ | ६.६ | उच्च/तंत्रस्तरीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी महिलांना वयोमर्यादेत शिथीलता देण्यात येईल. | | | | | | | | | |
| १३ | ६.७ | व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना दिल्या जाणाऱ्या विद्यावेतनाची महागाईच्या निर्देशांकानुसार नियमितपणे पुर्नरचना केली जाईल. | | | | | | | | | |
| १४ | ६.८ | विद्यावाचस्पती (Ph.D) अभ्यासक्रमासाठी महिला उमेदवारांना प्राधान्याने आरक्षण ठेवण्यात येईल तसेच त्या अभ्यासांतर्गत संशोधन अध्ययनासाठी असलेला कालावधी महिलांसाठी वाढवून देण्यात येईल. | | | | | | | | | |
| १५ | ६.९ | संशोधक मार्गदर्शक म्हणून महिलांना प्राधान्याने संधी दिली जाईल याची खातरजमा सर्व विद्यापिठे करतील. | | | | | | | | | |
| १६ | ६.१० | उच्च शिक्षणासाठी असलेल्या शैक्षणिक कर्जावर हा मुलांसाठी असलेल्या दराच्या तुलनेत मुलींसाठी ०.५% कमी आहे. तो २% कमी असावा अशी शिफारस उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत केंद्र शासनाकडे करण्यात येईल व व्याजदरातील परतावा करण्याची फरकाची रक्कम शासनामार्फत अदा केली जाईल. | | | | | | | | | |
| १७ | ६.१२ | सर्व शिक्षण संस्थांनी मुलींसाठी तीन महिन्यांचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणे. | | | | | | | | | |
| १८ | ६.१७ | सर्व विद्यापीठे, अभ्यासक्रम रचना समित्या / मंडळे यांनी अभ्यासक्रमात लिंगभाव संवेदनशीलता आणण्यासाठी स्वतंत्र लिंगभाव संवेदनशीलता अभ्यासक्रम रचना समिती निर्माण करुन लवकरात लवकर हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाईल. | | | | | | | | | |
| १९ | ६.१८ | शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिल्या जाणाऱ्या सर्व प्रशिक्षण कार्यक्रमात - सेवापूर्व प्रशिक्षण, ऑरिएन्टेशन कार्यक्रम, सेवांतर्गत आरक्षण, प्रशासकांचे प्रशिक्षण, विद्यापीठांचे सर्व प्रशिक्षण कार्यक्रम या सर्व टप्प्यांवर लिंगभाव संवेदनशीलता हा विषय अंतर्भूत करणे बंधनकारक असेल. | | | | | | | | | |
| २० | ६.२० | प्रत्येक शाळा, महाविद्यालयात ६ महिन्यातून एकदा प्रत्येक विद्यार्थीनींची वैद्यकीय तपासणी बंधनकारक असेल. त्यामध्ये रक्ताचाचणी, मासिक पाळीविषयक समस्या, हार्मोन्स मधील बदल, स्त्री रोग विषयक समस्या यांची तपासणी केली जाईल. शाळेत शारिरिक तपासणीच्या वेळेस स्त्री डॉक्टर किंवा महिला मदतनीस असणे सक्तीचे केले जाईल. | | | | | | | | | |

| अ. क्र. | धोरणातील मुद्दा क्रमांक | तपशील | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्ट्ये | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| २१ | ६.२१ | शाळांमध्ये सॅनिटरी पॅडस उपलब्ध करुन दिले जातील. दारिद्र्यरेषेखालील मुलींना मोफत आणि इतर मुलींना सवलतीच्या दरात सॅनिटरी पॅडस उपलब्ध करुन दिले जातील. सॅनिटरी नॅपकिन्स बरोबरच मासिक पाळीत ठेवावयाच्या स्वच्छतेचे प्रशिक्षण दिले जाईल. | | | | | | | | | |
| २२ | ६.२३ | सर्व शाळा, महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र विद्यार्थिनी कक्ष निर्माण करणे बंधनकारक राहील. तसेच १२ वी नंतर पुढील शिक्षण शिक्षणासाठी व्यवसायीक अभ्यासक्रमासाठी विशेष्ट मार्गदर्शन कक्षाची निर्मिती करण्यात येईल यात वसतीगृह, शिष्यवृत्ती यासंबधी माहिती देण्यात येईल. | | | | | | | | | |
| २३ | ६.२४ | शाळा, महाविद्यालय सुटण्याच्या वेळेतील बसेसच्या संख्या आणि पासधारक विद्यार्थी संख्या यांचा आढावा घेऊन ज्या ठिकाणाहून मुली शाळा, महाविद्यालयासाठी येत असतील तर त्या ठिकाणासाठी शाळा, महाविद्यालये सुटल्यावर मुलींसाठी विशेष बसेसचा सुरु करण्यात येईल. | | | | | | | | | |
| २४ | ६.२५ | शालेय प्रवास करतांना बसमध्ये मुलींकरीता महिला पदतनीस असणे सक्तीचे केले जाईल. | | | | | | | | | |
| २५ | ६.२७ | साधारणत: आठवीनंतर मुलींच्या खेळण्यावर बंधने येतात. शाळांनी मुलींच्या खेळण्यावर प्रोत्साहन देणे, सोयी सुविधा, क्रीडासाहित्य उपलब्ध करुन देणे, शाळांमध्ये महिला पी.टी. शिक्षक पदासाठी राखीव जागा ठेवणे, जिथे महिला पी.टी. शिक्षक नाही, त्यांनी अशा स्पर्धांना इतर शिक्षिकांना मुलींसोबत पाठविणे बंधनकारक करणे इ. गोष्टींवर भर दिला जाईल. | | | | | | | | | |
| २६ | ६.२८ | महिला शिक्षकांची बदली करतांना अपत्य संगोपन, मुलांचे शिक्षण विशेषत: दहावी, बारावी, अचानक निवासस्थान बदलावे लागणे, नवीन ठिकाणी एकटीने रहावे लागणे, नवीन ठिकाणी येण्याजाण्याची योग्य सोय नसणे, कुटुंबातील सदस्याच्या दुर्धर व्याधी, पन्नाशीनंतर कुटुंबात राहण्याची शारीरिक, मानसिक, भावनिक गरज याबाबींचा विचार केला जाईल. | | | | | | | | | |
| २७ | ६.२९ | महिला शिक्षकेच्या / प्राध्यापिकेच्या सेवेत खंड असेल तर तो पाच वर्षापर्यंत माफ करुन सेवेतील सर्व सुविधा, फायदे इ. साठी तिची एकूण सेवा लक्षात घेण्याबाबत योग्य विचार केला जाईल. | | | | | | | | | |
| २८ | ६.३ | प्रत्येक शाळा, महाविद्यालयांमध्ये स्टाफरूमला लागूनच शिक्षिका आणि प्राध्यापिकांसाठी स्वच्छतागृहाची सोय करणे सर्व शिक्षण संस्थांवर बंधनकारक करण्यात येईल. | | | | | | | | | |

| | मुद्दा क्रमांक | | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उदिष्टये | वर्ष २०१०-११ | | | वर्ष २०११-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| २९ | ६.३१ | दुर्धर व्याधीग्रस्त, गर्भवती, ६ वर्षाखालील अपत्य असणाऱ्या शिक्षिका / प्राध्यापिकांना अशैक्षणिक कामे न देण्याबाबत सर्व विभागांनी सूचना देण्यात येईल. | | | | | | | | | |
| ३० | ६.३२ | शिक्षकांसाठी असणारे प्रशिक्षण कार्यक्रम अनुदानित शाळा महाविद्यालयांबरोबरच विना अनुदानित शाळा, महाविद्यालयांनाही लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. | | | | | | | | | |
| ३१ | ६.३३ | पंतप्रधानांचे १५ कलमी कार्यक्रम सच्चर समिती व रंगनाथ मिश्रा यांच्या शिफारशी अंमलात आणण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ३२ | ६.३६ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक प्रवर्गातील स्त्रियांना (National Institute of Open Schooling) प्रवेश प्रक्रिया व प्रवेश शुल्क सुलभ करण्या संदर्भात राज्य शासनाकडून सूचित करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ३३ | ६.३७ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक प्रवर्गातील संस्थांना स्त्रियांसाठी शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालये स्थापन करण्याची कार्यवाही केली जाईल. | | | | | | | | | |
| ३४ | ६.३८ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक प्रवर्गातील महिलांच्या प्रती संवेदनशिलता निर्माण करण्यासाठी शासकीय/अशासकीय संस्थामधील कर्मचारी यांचेसाठी जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित केले जातील. | | | | | | | | | |
| ३५ | ६.३९ | अनुसूचित जाती-जमातींसाठीच्या योजनांच्या धर्तीवर अल्पसंख्याक स्त्रियांसाठी सुध्दा विविध योजना राबविण्यात येतील. | | | | | | | | | |
| ३६ | ६.४ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक वस्तीत जास्तीत जास्त अंगणवाडी मध्ये पाळणाघरांची सोय केली जाईल. | | | | | | | | | |
| ३७ | ६.४२ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पसंख्याक स्त्रियांसाठी उच्च व्यवसाय शिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमाची सोय करून या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेण्यासाठी कर्ज देण्यात येईल. | | | | | | | | | |
| ३८ | ६.४३ | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रमाणे माध्यमिक व उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या अल्पसंख्याक महिलांसाठी विशेष आरक्षण व शिष्यवृत्तीच्या योजना राबविल्या जातील. | | | | | | | | | |
| ३९ | ६.४४ | शासकीय करीअर मार्गदर्शन कार्यालय महिला केंद्रित असतील | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | धोरणातील मुद्दा क्रमांक | तपशिल | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्ट्ये | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ४० | ६.४५ | महिला व पुरुष क्रीडपटूंमधील भेदभाव दूर करण्यासाठी विशेष पावले उचलण्यात येतील त्यासाठी ---शाळा / महाविद्यालयामध्ये महिला प्रशिक्षकांची नियुक्ती बंधनकारक राहील. तसेच महिला व क्रिडा अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यात येतील. | | | | | | | | | |
| ४१ | | महिला क्रीडापटू, क्रीडा शिक्षक, क्रीडा अधिकारी यांच्या शिष्यवृत्तीत वाढ केली जाईल. | | | | | | | | | |
| ४२ | | क्रीडा क्षेत्रात महिलांचे शोषण होऊ नये म्हणून तालुका व जिल्हा स्तरावर दक्षता समितीची स्थापना करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ४३ | | क्रिडापटू विद्यार्थिनींसाठी खेळात सहभागी होण्यासाठी मोफत प्रवासाची सोय करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ४४ | | शिक्षण हा विकासाचा पाया आहे. महाराष्ट्र हे प्रगतीशील राष्ट्र आहे व मुले / मुली मिळून ९६% विद्यार्थ्यांची नोंदणी आहे. परंतु वरच्या इयत्तांमध्ये मुलींच्या गळतीचे प्रमाण खूप आहे. त्यामुळे त्या प्रश्नाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मुलींच्या शिक्षणाचा विचार केल्याशिवाय महिला धोरण पूर्णच होऊ शकत नाही. त्यामुळे स्त्रियांच्या शिक्षणाबाबत सकारात्मक भूमिका घेतील जाईल त्यासाठी--- सर्व मुली कमीत कमी १२ वी पर्यंतचे शिक्षण तरी पूर्ण करतील याची काळजी शासन घेईल. | | | | | | | | | |
| ४५ | | या मुली केवळ साक्षरच होणार नाहीत. तर व्यावसायिक व जीवन कौशल्येही शिकतील. यासाठी शासन समाजातील इतर उपक्रमशील घटकांबरोबर प्रयत्नशील राहील.<br>त्यासाठी | | | | | | | | | |
| ४६ | ६.४६ | मुलींच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदतीच्या रक्कमेत वाढ केली जाईल.त्याचप्रमाणे शालेय आणि महाविद्यालयीन शिष्यवृत्तीसाठी एक खिडकी योजना राबविण्यात येईल. | | | | | | | | | |
| ४७ | ६.४७ | उच्च, तंत्र व व्यावसायिक शिक्षणातील फी - परतावा - योजना मुस्लिम अल्पसंख्यांकापर्यंत वाढविण्यात येईल. कारण मुस्लिम महिलांत शिक्षणाचे प्रमाण फार कमी आहे. स्थानिक गरजा लक्षात घेऊन महिलांसाठी नवीन तांत्रिक महाविद्यालये सुरु करण्यात येतील. | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | धोरणातील मुद्दा क्रमांक | तपशील | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्टये | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ४८ | ६.४८ | पायाभूत अभ्यासक्रम गणित - भाषा - इंग्रजी - संवाद कौशल्ये - लेखन कौशल्ये यांचा अंतर्भाव केला जाईल. ज्यायोगे मुली समाजात मागे पडणार नाहीत. | | | | | | | | | |
| ४९ | ६.४९ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अल्पसंख्याक आणि मागासवर्गीय मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्यास शासन प्रयत्नशील राहील. | | | | | | | | | |
| ५० | १०.३ | राज्यभरातील बस / रेल्वे स्थानके, बाजार, तीर्थक्षेत्रे, पर्यटन स्थळे, शाळा, महाविद्यालये, काम करण्याच्या जागा या ठिकाणी पुरेशी व स्वच्छ प्रसाधनगृहे निर्माण करावीत. स्वच्छता गृहामध्ये पाण्याची व्यवस्था सक्तीची राहील. मुख्यत: पाण्याची व्यवस्था नसेल तर दंडात्मक कार्यवाही केली जाईल. या स्वच्छता गृहाचे व्यवस्थापन महिला गटांकडे पूर्ण व्यावसायिक तत्वावर दिले जाईल. | | | | | | | | | |
| ५१ | ११.४ | व्यसनांच्या दुष्परिणामांचा अभ्यासक्रमात समावेश करून शाळा व महाविद्यालयात व्यसनमुक्ती समुपदेशन केंद्र स्थापन केले जाईल. तसेच शाळा व महाविद्यालये यांच्या १०० मीटर परिसरात ना-फेरीवाला क्षेत्र जाहीर केले आहेच त्याची कठोर अंमलबजावणी करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ५२ | २१.८ | महिला लोककलावंतांना, त्यांच्या पाल्यांना लोककला विषयक शास्त्रशुध्द प्रशिक्षण देणाऱ्या विद्यापीठांच्या लोककला अकादमींना प्रतिवर्षी भरीव अनुदानाची तरतूद करण्यात येईल. | | | | | | | | | |
| ५३ | २२.४ | पदवी, पदव्युत्तर, तांत्रिक व उच्च शिक्षण तसेच सरकारी / खाजगी नोकरीमध्ये देवदासी व त्यांच्या अपत्यांना अग्रक्रम देण्यात येईल. | | | | | | | | | |
| ५४ | २३.१.६ | देहविक्री करणाऱ्या महिला व त्यांच्या मुलांकरीता तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण देण्याबाबत गोवा राज्यातील प्रभात योजनेच्या धर्तीवर नावीन योजना राबविण्यात येईल. | | | | | | | | | |
| ५५ | २३.२.७ | देहविक्री करणाऱ्या व्यक्तींच्या मुलांना शालेय / महाविद्यालयीन शिक्षण अर्धवट सोडावे लागू नये, यासाठी त्यांना विशेषत्वाने शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. त्यांच्या मुली यांच्याशी सल्लामसलत करून त्यांना आवश्यकतेनुसार व्यवसाय प्रशिक्षण आणि उद्योग निर्मितीचे सहाय्य व संधी दिली जाईल. | | | | | | | | | |

| अ. क्र. | धोरणातील मुद्दा क्रमांक | तपशिल | लक्ष प्राप्तीसाठी निश्चित केलेल्या योजना | योजनेचे लक्ष/ उद्दिष्टये | वर्ष २०२०-२१ | | | वर्ष २०२१-२०० प्रस्तावित | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | वित्तीय लक्ष | भौतिक लक्ष्य | साध्य/ प्राप्ती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| ५६ | २५.३ | महिला फक्त सामाजिक क्षेत्रातच कार्यरत नसून संरक्षण आता आयटी क्षेत्र, सरकारी नोकऱ्या, सार्वजनिक उपक्रम, विविध संस्थांमध्ये, उद्योग अशा क्षेत्रातही आपल्या कार्याचा ठसा उमटवित आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या प्रत्येक विभागातून वर्षभरातून उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांसाठी पुरस्कार योजना तयार करण्याचे आदेश देण्यात येतील व त्यानुसार प्रत्येक विभागाच्या तीन महिलांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाची पारितोषिके देण्यात येतील व या सर्व पारितोषिकांचे वितरण जागतिक महिला दिनी करण्याचे बंधन सर्व विभागांना घालून देण्यात येईल. तसेच सरकारी नोकऱ्या, सार्वजनिक उपक्रमामध्ये कार्यरत असलेल्या पुरस्कार प्राप्त महिलांना विशेष वेतनवाढी देण्यात येतील. | | | | | | | | | |

Scanned with OKEN Scanner

# महाराष्ट्र शासन


विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण, कोकण विभाग,पनवेल

शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl.mah@gov.in     Website : http://jdhepanvel.org     दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५ ३६४७.


क्र. विसस/ उशि/ कोंविप/ मशि/ २०२४/ [illegible]     दिनांक : १४/०२/२०२४

प्रति,

प्राचार्य,

सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित,

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक व आदर्श महाविद्यालये,

जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग.

विषय :- सर्व शिक्षण संस्थानी मुलींसाठी तीन महिन्याच्या कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविणेबाबत...

संदर्भ :- १. महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचे पत्र दि. ३१/१२/२०२०.

२. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.७५/आस्था-२, दि. ११/०२/२०२१.

३. श्री. अमर जालिंदर एकाड, अध्यक्ष सुराज्य निर्माण सेना महाराष्ट्र राज्य यांचा ई-मेल दि. १४/०२/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने २०१४ मध्ये ३ रे महिला धोरण जाहिर केले आहे. महिला धोरण २०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ नुसार सर्व शिक्षण संस्थानी मुलींसाठी तीन महिन्याचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविण्याबाबत सूचित केलेले आहे.

सबब सर्व महाविद्यालयांनी महिला धोरण २०१४ मधील मुद्दा क्र. ६.१३ नुसार मुलींसाठी तीन महिन्याचा कराटे प्रशिक्षण कार्यक्रम किमान एकदा राबविण्यात यावे.

(डॉ. संजय जगताप)

विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

प्रत :- १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे -४११ ०१६ यांना माहितीस्तव सादर.

२. श्री. अमर जालिंदर एकाड, अध्यक्ष सुराज्य निर्माण सेना महाराष्ट्र राज्य यांना माहितीस्तव अग्रेषित.


Scanned with OKEN Scanner